
एक सामना


सेरिब्रल पॉल्सी



लेखन: शैरी

चित्र: जैफ

मराठी: अश्विनी बर्वे



एक सामना

सेरिब्रल पॉल्सी




माइक दहा वर्षाचा आहे. तो आता पाचवीत गेला आहे. तो एका विशेष शाळेत जातो, जिथे त्याच्या सर्व मित्रांकडे कुबड्या होत्या किंवा माईक सारखी चाकांची खुर्ची होती. त्या शाळेत माईक रोज पोहत असे त्यामुळे त्याच्या मासपेशी मजबूत होतील. तो आणि त्याचे दोस्त चाकांच्या खुर्चीवर बसून अनेक मजेदार खेळ खेळत असत. कधी ते तोपर्यंत मागे झुकत जोपर्यंत त्यांच्या खुर्च्या मागच्या चाकावर उभ्या राहत. आणि मग ते खुर्च्या गोल-गोल फिरवत. माईक असे करण्यात माहिर होता.तो आपली चाकांची खुर्चीवरून शर्यत लावत. माईकला शर्यत लावायला आणि खेळायला आवडत असे.

माइकला जे आवडत नव्हते ते म्हणजे लोकांनी त्याच्याकडे एकटक बघणे. खरंतर अनेक लोकांनी अशी मुले बघितली नव्हती. ज्यांना सेरिब्रल पॉल्सी (मेंदूचा पक्षाघात) झाला आहे. माइकला हे माहीत होते. तरीपण कोणी त्याच्याकडे एकटक बघणे त्याला आवडत नसे.

माइकला अशा प्रकारचा सेरिब्रल पॉल्सी होता ज्याला हिमोप्लेजिया म्हणतात. म्हणजे त्याचे पाय काम करत नव्हते.त्याच्या मेंदूचा जो भाग पाय नियंत्रित करतो. ते त्याच्या जन्माच्या वेळी धक्का लागल्याने झाले होते. जेव्हा माईक सहा वर्षाचा झाला तेव्हा त्याच्या पायांचे ऑपरेशन झाले. पाय सरळ करण्याचा तीच पद्धत होती. पण तेव्हा त्याला पायावर ब्रेसेस् घालावे लागत, म्हणजे ते ताणलेले राहत. कधी कधी त्याच्या पायाच्या मासपेशी झटक्यात आखडत. त्यामुळे त्याचा उचलल्या सारखा होई. कारण माईकचे आपल्या पायावर काहीच नियंत्रण नव्हते त्याला नेहमी चाकांची खुर्ची वापरावी लागे.






माइकला आपल्या नव्या शाळेत काही गोष्टींसाठी मदतीची गरज लागत असे. तिथं कैफेटेरियामध्ये दूधाचे डबे एवढे वर असत की तो खुर्चीवर बसून ते उचलू शकत नसे.कारण असे केल्याने मांडीवर ठेवलेला ट्रे पडला असता. अशा प्रकारे बाथरूमचे सर्व दरवाजे उघडण्यासाठी त्याला मदत लागत असे. पण सुरुवातीला तो मदत मागण्यास कचरत असे. त्याला वाटे की सगळेजण त्याच्याकडे एकटक बघत आहेत.

शाळेच्या पहिल्या दिवशी रेन्डी नावाच्या मुलाने माईकची नारंगी रंगाची बेसबॉल टोपी ओढली आणि तिथेच ओरडत तो उभा राहिला ‘‘स्पैज़ (अपंग)ची टोपी माझ्याजवळ आहे. माईकला त्यावेळी नवीन शाळेचा राग आला होता.

जेव्हा माइकने आपल्या वडिलांना घडलेली घटना सांगितली, “बाळा हे सोप्पे नाही, हो की नाही? पण तुला सर्व प्रकारच्या लोकांबरोबर राहायला शिकावे लागेल. त्यामुळे याबाबत अधिक माहित करून घेण्यासाठी आणि शिकण्यासाठी शाळा ही एक चांगली जागा आहे.”

माइक वडिलांना म्हणाला की तो शाळेत जाईन. पण शाळा तर त्याला आवडणार नाही.



माइकच्या मागच्या शाळेचे शिक्षक हळूहळू पुढे जात कारण विद्यार्थीना बघण्यास, ऐकण्यास त्रास होत असे. पण नवीन शाळेत अभ्यास अवघड होता. पण माईकला या गोष्टीचे काही वाटत नव्हते. त्याला चांगले मार्क्स मिळत असत.

नवीन शाळेत एक युवा केंद्र होते. तिथे चाकांच्या खुर्चीसाठी एक उतार केला होता. आता एक मोठा खेळण्याचा वर्ग होता. त्यात पुल टेबल होते. माईकला सुद्धा पुल खेळायला आवडत असे. जर कोणी त्याला उठायला मदत केली तर तो टेबलाच्या साहय्याने उभा राहिला असता.आणि मग तो क्यू स्टिकचा उपयोग करू शकला असता. माईक घरी जवळ जवळ रोज वडिलांबरोबर पुल खेळत असे. पण दुसरी मुले असं वागत, जसे की तो कोणी विचित्र आहे, त्याच्यापासून ते दूर पळत.






म्हणून माइक खेळाच्या वर्गाच्या उंबरठ्यावर बसून बघत बसे. कदाचित काही काळ गेल्यावर त्याचा परिचय त्या मुलाशी होईल ज्यांना पुल खेळायला आवडत होते. कदाचित मग ते त्याला मदत करतील. पण तोपर्यंत तो त्यांना खेळतांना बघत बसे. आणि तो त्यांना बेसबॉल खेळतांना बघेल. तो त्यांना आपल्या मित्रांबरोबर मैदानात धावतांना, हसतांना बघेल.

पण एक दिवस शाळेतून घरी आल्यावर माईक रडू लागला. “सगळं खूप वाईट आहे आई. कोणीच माझ्याशी बोलत नाही. कोणालाच मी आवडत नाही.”

आईने त्याला जवळ घेतले. “अरे माईक, अशाने मलाही रडू येईल.” आई म्हणाली.



माइकच्या शिक्षिकेला तो उदास आहे हे लक्षात आले. म्हणून तिने त्याला शाळा सुटल्यावर थांबायला सांगितले.

''माइक,'' त्या म्हणाल्या. "तुला ही शाळा विशेष आवडत नाही.हो ना?"

''हो मिसेस कॉख़र,'' माइकने उत्तर दिले. "या पूर्ण शाळेत मी एकटा चाकावर बसलेला मुलगा आहे. मला वाटते की मी सगळ्यात वेगळा आहे."

''ज़रूर वाटत असेल," मिसेस कॉख़र म्हणाल्या. ''आपल्याला दुसऱ्या मुलांना हे दाखवून द्यायचे आहे की तू त्यांच्यापेक्षा इतकाही वेगळा नाही.मला काही सुचत आहे.मला सांग तुला कोणत्या गोष्टी आवडतात."

''मी चैकर्स चांगला खेळू शकतो," माईक म्हणाला. मी जवळजवळ रोज माझ्या वडिलांबरोबर पूल खेळतो आणि मी पंजा लावण्यात माहिर आहे."


“पंजा लावण्यात?” मिसेस कॉखर म्हणाल्या. “याने काम होऊ शकते. आपण एक सामना ठेवू शकतो. पण वर्गात काही मुलं चांगले ताकदवान आहेत. खास करून रेंडी”

“मला विश्वास आहे की मी जिंकू शकतो, तुम्ही मला संधी द्याच.”

“मग चल तू आधी माझ्याच बरोबर पंजा लाव,” मिसेस कॉख़र म्हणाल्या. “बघू या तू मला हरवू शकतो की नाही.”

मिसेस कॉखरचा हात टेबलाच्या एका बाजूला वळवण्यात माईकला जास्त वेळ लागला नाही. त्यांना काहीसे आश्चर्य वाटले. त्यांनी माईकला डोळा मारला. “मग पंजा लावण्याचा सामनाच होऊन जाऊ दे,” त्या हसत म्हणाल्या.





दुसऱ्या दिवशी जेव्हा मुलं आपापल्या जागेवर बसले तेव्हा मिसेस कॉख़र यांनी विचारले, “आज पंजा लावण्याचा सामना होणार आहे, कोण भाग घेणार आहे?” वर्गातल्या प्रत्येकाचा हात वर होता.

‘‘छान! सूज़न आणि मेरी तुम्ही दोघीजणी सुरुवात करणार का?”

सूज़न आणि मेरी एक टेबलाजवळ समोरासमोर बसल्या. त्यांनी आपले ढोपर टेबलावर टेकवले आणि एकमेकींचा पंजा करकचून पकडला.

‘‘एक, दोन, तीन!’’ मिसेस कॉख़रने म्हटले.

सूज़नने सहजतेने मेरीचा हात झुकवला. मिसेस कॉखर हसल्या. “पुढचा” त्या म्हणाल्या.

प्रत्येक मुलाला मागच्या जिंकणाऱ्या मुलाशी पंजा लावण्याची संधी मिळत असे. रेंडी आपला पहिला सामना सहज जिंकला. नंतर तो प्रत्येकवेळी जिंकत गेला. सगळ्याची पाळी येऊन गेली होती. तरीही तो टेबलवर बसलेलाच होता.

“आता तुझी पाळी आहे माइक, तू प्रयत्न करशील का?” मिसेस कॉख़र यांनी विचारले.

“याच्याबरोबर पंजा लावायचा?” रेंडी म्हणाला, “अरे याला कुठे काही लागेल”


“लावून तर बघ,” माईक म्हणाला. तो थोडासा घाबरला होता पण रेंडी कडे बघून हिंमतीने हसला.

सुरुवातीला असे वाटत होते की रेंडी माईकला स्पर्श करायलाच घाबरत होता. पण त्यांनी एकमेकांचे पंजे भिडवले आणि ढोपर टेबलवर टेकवले.

“एक, दोन, तीन, सुरू!” मिसेस कॉखर म्हणाल्या.

माइकने क्षणार्धात रेंडीचा पंजा टेबलवर खाली पाडला. रेंडी दंग होऊन बघत राहिला.

“मला तुला दुखवायचे नव्हते,” तो नाराज होत म्हणाला. “चल परत पंजा लावू.”




दुसऱ्यावेळी माइकला थोडं कठीण गेलं, पण शेवटी तो रेंडीचा हात टेबलवर वाकवू शकला. माईकच्या मनात गुदगुल्या झाल्या. पण तो थोडासा घाबरला सुद्धा. तो जिंकल्यामुळे रेंडी नाराज झाला तर?

"खरंतर माझ्याकडे एक सुविधा आहे," माईक रेंडीला म्हणाला. "आपल्या चाकांची खुर्ची चालवल्याने माझे दंड खूप मजबूत झाले आहेत."

"अच्छा," रेंडी म्हणाला. तो आपल्या बेंच कडे जात असतांना थोडासा नाखुश दिसत होता.

"मला वाटतं आपल्या वर्गात पंजा लावण्याचा चॅम्पियन माइक स्टीवन्स आहे" मिसेस कॉख़र यांनी घोषणा केली. "आपण उद्या काहीतरी वेगळे करू, उद्या चैकर्सचा सामना खेळू. ज्या कोणाकडे चेकर्सचे बोर्ड आहेत, त्यांनी उद्या जरूर घेऊन या."





त्यादिवशी शाळा सम्पल्यावर रेंडी माईकजवळ आला.

''तू येण्याच्या आधी आपल्या वर्गात एवढे खेळ कधीच खेळले गेले नव्हते," तो म्हणला. "तू काय चेकर्समध्ये सुद्धा उस्ताद आहे का?"

''मी ठीक-ठाक खेळतो,'' माइक म्हणाला. "माझ्या जुन्या शाळेत आम्ही रोज चेकर्स खेळत असू.आम्ही रोज पोहायला पण जात असू."

''तू पोहू पण शकतो? रेंडी हैराण झाला होता परत.

''बेशक,'' माइक म्हणाला. "खरंतर पाणी माझे शरीर वर उचलून ठेवते आणि मी हातांनी पाणी ढकलतो. माझे हात खूप मजबूत आहेत, आठवतं ना."

''हो मित्रा आठवते.ते सोड तू पंजा लावण्यात जिंकला असशील, पण मी माझ्या बहिणी बरोबर रोज चेकर्स खेळतो. ती हायस्कूल मध्य आहे. पण मीच जिंकतो. रेंडी हसला आणि आपल्या मित्रांना भेटायला गेला.''

दुसऱ्या दिवशी दुपारी जेवण्याच्या सुट्टीत सुजन माईक जवळ बसली. “वर्गात येतांना तुझी खुर्ची आत ढकलण्यासाठी तुला मदत हवी आहे का?” तिने माईकला विचारले.

‘‘आभार, पण मी माझी खुर्ची ढकलतो,” माईकणे उत्तर दिले. ‘पण तू बरोबर आलीस तर चांगले वाटेल.”

‘‘तू चेकर्समध्ये पण जिंकशील का?” सुजनणे विचारले.

‘‘प्रयत्न तर पूर्ण करेल,” माईक म्हणाला.





चैकर्सचा सामना दुपारी जेवणाच्या सुट्टीनंतर सुरु झाला. माईकने आपली प्रत्येक चाल विचारकरून खेळली. अनेक सामने झाल्यावर फक्त दोन खेळाडू राहिले. माइक आणि रेंडी. जेव्हा तो डाव संपला तेव्हा मिसेस कॉख़रने विजेता घोषित केला.

''माइक स्टीवन्स आपला चेकर्स चाम्पियन आहे. खरंतर रेंडी तू पण चांगला सामना खेळला.'' ती दोघांकडे बघून हसली. रेंडीच्या चेहऱ्यावर सुद्धा हसू होते.

''तू अजून काय काय करू शकतो?'' त्याने माईकला विचारले.

‘‘मी पूल खेळू शकतो. पण मला उभं राहण्यासाठी मदत लागते.तेव्हा मी माझी खुर्चीच्या समोर पूल टेबल टेकवतो. पण माहित आहे का कधी कधी माझा तोल जातो. म्हणून कोणीतरी माझ्याजवळ नेहमी उभं असणे गरजेचे आहे.”

‘‘मी पाहिलं आहे, आम्ही खेळतांना तू बघत असतो,” रेंडी म्हणाला. “तू कधी सांगितलं नाहीस की तुला खेळायचं आहे.”

‘‘कारण मला भीती वाटत होती की माझ्याबरोबर कोणालाच खेळणार नाही याची. आणि मला सांभाळत माझ्याजवळ कोण उभं राहील?” माईकने सांगून टाकलं.

‘‘मी,’’ रेंडीने उत्तर दिले.



त्या दिवशी जेव्हा माईक आणि रेंडी खेळण्याच्या वर्गात आले, एक मुलगा ओरडला, “हा वर्ग पूल खेळाडूंसाठी आहे, एक अपंग थोडाच खेळ खेळू शकतो.”

माइक थांबला त्याने नजर वर उचलली. वर्गातला प्रत्येक मुल त्याच्याकडे डोळे रोखून बघत होते. तेव्हा माईकने बघितले की रेंडी हसत आहे.

‘‘खेळून तर बघा,” रेंडी म्हणाला “एकदा भिडून तर बघा.”



माइक आपल्या नवीन शाळेत दुसरे वर्ष सुरु करणार आहे. आता त्याला शाळा आधी पेक्षा चांगली वाटते आहे. अजूनही काही मुले त्याच्याकडे डोळे रोखून बघतात. पण इतके नाही जितके आधी बघत असत. आता काही असे वर्गमित्र होते ज्यांच्याकडे तो मदत मागू शकत होता. मुलांना हे माहीत झालं आहे की माईक त्यांच्यापेक्षा एवढाही वेगळा नाही. तो फक्त चाकांच्या खुर्चीवर बसणारा मुलगा नाही. तो माईक आहे.



माइक दहा वर्षाचा आहे. तो पाचवीत आहे. तो आधी एका विशेष शाळेत जात होता, जिथे त्याचे मित्र कुबड्यां घेऊन किंवा चाकांच्या खुर्चीवर बसलेले असत. पण यावर्षी या सार्वजनिक शाळेत जाणार आहे. तो चांगला पोहणारा आहे. त्याला पुल खेळणे आवडते. पण लोक त्याच्याकडे रोखून बघतात ते त्याला आवडत नाही. त्याच्या नवीन शाळेतील मुलांनी सेरिब्रल पॉल्सी (मेंदू घात) वाल्या मुलाला कधी बघितले नाही. म्हणून ते त्याच्याकडे रोखून बघतात, पण माईकला ते आवडत नाही.